# प्राचीन महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्था

डॉ. घनश्याम सुबराव महाडीक
सहाय्यक प्राध्यापक, पदव्युत्तर
इतिहास विभाग,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,
अमरावती

शिक्षणाद्वारे व्यक्तिजीवन, समाजजीवन व राष्ट्रजीवन घडविता येते. अपेक्षित परिवर्तन घडवून आणता येते. सुसंस्काराच्या बाबतीत बालपणापासून, आई, वडील व शिक्षकाची भूमिका महत्वाची असते म्हणूनच भारतीय संस्कृतीमध्ये आदराने मातृ,पितृ,आचार्य देवो भव असे म्हटले आहे. शिक्षणाची व्यवस्था प्राचीन काळी महाराष्ट्रात कशी होती याचा शोध पुरातत्वीय व वाड्मयीन साधनाआधारे प्रस्तुत लेखात घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. महाराष्ट्रात प्राचीन काळापासून ब्राह्मणी, बोध्द, जैन धर्माचे अस्तित्व आहे. मोठया प्रमाणात वैदिक ब्राह्मण, बोध्द भिक्षू–भिक्षूणी , जैन साधू यांचा धर्मग्रंथाचा अभ्यास होता असे कोरीव लेखातील व विविध धार्मिक ग्रंथातील गुरू–शिष्य परंपरेच्या वर्णनावरून लक्षात येते.

प्रारंभी वेदमंत्र हे लिहले गेले नव्हते. त्यामुळे वेदमंत्राचे जतन पाठांतर करून केले जाई. त्यामुळे प्रारंभी शिक्षणव्यवस्थेत पाठांतरावर भर होता. ऋषीकडून मौखिक व चिंतनपर अशा दोन अध्यापनपध्दतींचा अवलंक केला जाई. गुरूगृही राहून विद्यार्थी शिकत असे. विद्यार्थी संख्या मर्यादित असल्यामुळे शिक्षकांना वैयक्ति लक्ष देण्यास वाव मिळत नसे. आश्रमातील शिक्षण संपल्यानंतर गुरू शिष्याला विव्दज्जन परिषदेत हजर करत असे. तेथील परीक्षा उत्त्तीर्ण झाल्यानंतर त्याला स्नातक पदवी दिली जात असे. प्राथमिक , माध्यमिक व उच्च अशी काही तेव्हा शिक्षणाची प्रतवारी केलेली नव्हती.

वाकाटक काळापासून महाराष्ट्रात सर्वच ब्राह्मण वस्ती असलेल्या गावी ज्ञानप्रसाराचे काम चालू होते. आपल्या राज्यात सांस्कृतिक संपन्नता वाढावी म्हणून राजे लोकांकडून वेगवेगळया ज्ञानशाखेत पारंगत असणाऱ्या विद्वानांना अग्रहार जमिनी दिल्या जात. अग्रहार म्हणजे राजाकडून ब्राह्मणांना करमुक्त दान केलेली जमीन होय. अग्र म्हणजे प्रथम अर्थात ब्राह्मण आहार म्हणजे प्रदेश अथवा भूमी. तेव्हा अग्रहार म्हणजे ब्राह्मणांना दान दिलेली भूमि अथवा गावा होय. [1]

ब्राह्मणाचे दैनंदिन अध्यापन व धार्मिक कर्मकांडाचे काम अखंडितपणे चालावे ब्राह्मणांच्या उदरनिर्वाहाची सोय व्हावी एवढाच हेतू अग्रहार दान देण्यामागे असावा. चौदा शास्त्रामध्ये प्रविण असलेल्या 112 ब्राह्मण वस्तीचे कुक्कुनुरू अग्रहार (स्थळ)यादव शासन काळात प्रसिध्द होते.[2] पुळूज लेखानुसार (जि. सोलापूर) येथील शिक्षक वेद, वेदांग व तत्वज्ञान या विषयामध्ये पारंगत होते.3 नेऊरगांव (जि. औरंगाबाद) शके 1200 या लेखानुसार रामदेव यादवाने आपल्या गुरूच्या आज्ञानुसार विधिवास (नेवासे)

खंपणकातील बिल्वग्राम, पिपलग्राम व त्यामधील सर्व भूभाग ब्राह्मणांना अग्रहार करून दिला.[4] अशाप्रकारे अग्रहार यादव राज्यकर्त्यांनी दान दिल्याचे लीळाचरित्रात नमुद केले आहे. [5]

सातवाहनापासून ते यादव राज्यकर्त्यांपर्यंत अनेक विद्वानांना राजाश्रय दिला होता. त्या विद्वानामध्ये चांगदेव हा होता. त्याने आपल्या आजोबाच्या (भास्कराचार्य) ग्रंथाचा अभ्यास व्हावा म्हणून चाळीसगावजवळ पाटण येथे एक मठ (ग्रंथसंग्रहालय) उभारला. या मठाबद्दल शके 1128 च्या पाटण लेखात चांगदेव लिहतो.

तस्मात्सुतः सिंघण चक्रवर्ती देवज्ञवर्योडजनि चांगदेव!

श्री श्रास्कराचार्यनिबध्द शास्त्र विस्तार हेतोःकुरूते मठ य.[6]

या लेखात सदर मठाच्या खर्चासाठी चोख व्यवस्था केल्याचे दिसून येते. पाटणमध्ये विक्रीसाठी येणाऱ्या मालावरील कराचे उत्पन्न ग्राहकाकडून प्रत्येक आसूमागे विसावा भाग, पहिल्या घाण्याच्या वाणाची लोटी व नंतरच्या प्रति घाण्यामागे पळीपळी तेल मठासाठी मिळत असे. याबरोबर राज्यकर्त्यांकडून या मठास जमीन दान देण्यात आली होती. या उत्पन्नातून सदर मठाचा खर्च भागविला जाई.

**शिक्षणाची उद्दिष्टयेः**

प्राचीन काळी शिक्षणाची चारित्र्य संवर्धन करणे, व्यक्तिमत्वाचा विकास करणे, संस्कृती संवर्धन करणे, साहित्य संवर्धन करणे , ज्ञानप्राप्ती , सामाजिक सेवा, धार्मिक हेतू, कर्तव्यपरायणता ही प्रमुख उद्दिष्टये साध्य करण्याचा प्रयत्न त्यावेळची शिक्षण केंद्रे करत होती.

**अभ्यासक्रम व विषयः**

शुद्रा व्यतिरीक्त उरलेल्या तीन वर्णातील बालकाला वयाच्या बारा वर्षापर्यंत वेदाध्यन करता येत असे. याशिवाय ब्राह्मणे आरण्यके, उपनिषदे, पुराणे, गणित, खगोलशास्त्र , भाषाशास्त्र, इतिहास, ज्योतिषशास्त्र, व्याकरण या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश असे. वैश्य वर्णातील विद्यार्थी आपल्या व्यवसायाशी संबंधीत विषयाचा अभ्यास करत असे. क्षत्रिय विद्यार्थी दंडनीती, युध्दनीती यांचा अभ्यास करत असत. ब्राह्मण विद्यार्थी वरील सर्व विषयात पारंगत होत असे. सातवाहन काळानंतर काळाच्या ओघात संस्कृत शिकण्याचा अधिकार ब्राह्मणवर्गापूरताच मर्यादीत राहीला. बहुन लोकांनी संस्कृत शिकण्याचा अधिकार नसल्याने हिंदू धर्मातील सर्वश्रेष्ठ ज्ञान अनाकलनीय अशा संस्कृत भाषेत बंद झाले. पुढे अनेक बोलीभाषा उदयास आल्यानंतर संस्कृत भाषा मागे पडून इतर वर्णीयांना वेदविद्या बंद झाली या संदर्भात संत ज्ञानेश्वर म्हणतात.

"वेद संपन्न होय ठायी !परी कृपण ऐसा आन नाही /
जे कानि लागला तिहि! वर्णाच्या !!
येरा भवव्यथा ठेलेया! स्त्री शुद्रादिका, प्राणियां!
अनवसरू मांडूनिया !राहिला आहे!'(ज्ञा.18–1457–58)

बाराव्या शतकातील शिक्षण व्यवस्था विषय अभ्यासक्रम या संदर्भात मराठी भाषेतील तत्कालीन वाड्.मयात अनेक शास्त्रे आणि विषयांचा उल्लेख आला आहे. ज्ञानेश्वरांनी पैठण येथे असताना अध्यात्मग्रंथाचा अभ्यास केला वेद, उपनिषदे, हरिवंश, गीता, भागवत शंकराचार्याचे ग्रंथ यांचा ज्ञानेश्वरीवर उघडउघड संस्कार झाल्याचे निदर्शनास येते. ज्ञानेश्वरानी पहिल्या गणेशस्तवनात वेद, स्मृती, अष्टादशपुराणे, काव्यनाटके, षडदर्शन, न्यायशास्त्र, अर्थशास्त्र, वेदांत , बौध्दमत मीमांसा द्वेताद्वेतमते दशोपनिषदे इ.विषयांचा उल्लेख केला आहे.तसेच कर्मकांड ,ज्योतिष, शिल्प, सूपकर्म आगम, वैद्यक, गारूडी, अर्थर्वणनिधी, कोकशास्त्र, निर्धट, व्याकरण इ. शास्त्राचे उल्लेख ज्ञानेश्वरांनी केले आहेत.[8]

लीळाचरित्रात अंतरिक्षमगन विद्या, प्रल्हादविद्या, अस्त्रविद्या, चौरंगीविद्या, आणवविद्या, हटयोगविद्या, गोपाळमंत्रविद्या, चेटक किंवा पवनविद्या, वेदविद्या, मोहनविद्या , यंत्रासनविद्या इ. शिक्षण विद्यांचा उल्लेख आला आहे.[9] तत्कालीन साहित्यात वेदशाळा[10], शिल्पविद्या[12], चित्रशाळा या शिक्षणसंस्थाचा उल्लेख आला आहे. राजकुंटूबातील विद्यार्थ्यासाठी धनुर्विद्या , अश्वारोहण शिकवले जाई. क्षात्रविद्यादानासाठी तरबेज असे शिक्षक नेमले जात.[13] तेराव्या शतकातच शारंगधरने गायन, वादन, नर्तन, नाटक या बाबत संगीत रत्नाकर हा ग्रंथ देवगिरी येथे लिहला या ग्रंथावरून महाराष्ट्रात संगीत क्षेत्रातील शिक्षण तज्ञ होते हे समजते.

**प्रसिध्द शिक्षण केंद्रेः**

ब्रह्मण बालकास विद्याभ्यासकरिता उपनयन संस्कार झाल्यानंतर गुरूगृही पाठविले जाई. शिक्षण घेत असताना गुरूगृही शिष्याला गुरूची सेवा करावी लागे.[14] शिक्षणाच्या पाठशाळा गावोगाव असत. या पाठशाळामधून वेदांचे अध्ययन मोठया प्रमाणात केले जाई. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एखा्द्या विषयात प्राविण्य संपादन करावयाचे व नंतर गृहस्थाश्रम स्वीकारून अध्यापन कामास सुरूवात केली जाई. प्राचीन काळी मालखेड, कल्याणी, देवगिरी, पैठण, पाटण,कऱ्हाड , बीड, वाघळी अशा गावी पाठशाळा व शिक्षणाची केंद्रे होती.[15] नांदेड येथे पाठशाळा असल्याचा लीळाचरित्रात उल्लेख आला आहे[16] या काळात देवगिरी हे शहर सर्व प्रकारच्या शिक्षणाचे केंद्र बनले होते.[17] पाठशाळेत आवश्यक तेवढी प्रगती झाल्यानंतर विद्यार्थ्याला पाहिजे तो विषय निवडता येई. तज्ञ आचार्यांचे शिष्यत्व पत्करून त्या विषयात प्राविण्य संपादन करता येई. प्रत्येक शाखेतील तज्ञ अध्यापकाकरवी पाठ देण्याची सोय केलेली असे. बौध्द शिक्षणपध्दतीमध्ये प्रवज्या विधीनंतर शिक्षणास सुरूवात होत असे. या विधीवेळी संबंधित बालकाचे डोक्यावरील केस काढून त्यास पीतवसत्र, नेसवत नंतर बालक भिक्खूला नमन करे व शिक्षणास प्रारंभ होई. बौध्द विहारातून तत्वज्ञान , त्रिपीटके, वैदिक धर्मग्रंथ, तर्कशास्त्र, योग, व्याकरण जातके, वैद्यकशास्त्र यांचे शिक्षण दिले जाई. सातवाहन काळापासून पुढे महाराष्ट्रात 800 बौध्द लेण्या कोरल्या आहेत. त्यात किमान सात ते आठ भिक्षू वास्तव्य करून अध्यापनाचे कार्य करत असावेत. प्राचीन काळी कार्ले, पितळखोरा, अजिंठा, कान्हेरी, कऱ्हाड, वेरूळ, जुन्नर, औरंगाबाद,

कोंदिवटी(जि.ठाणे), नाशिक ही प्रसिध्द बौध्द शिक्षण केंद्रे होती. कान्हेरी येथे उत्कृष्ठ बौध्द ग्रंथालय होते. जुन्नर येथील बौध्दमठात स्त्री शिक्षणाची विशेष व्यवस्था होती. ब्राह्मणी व बौध्द धर्माप्रमाणे प्राचीन काळी जैन धर्माने देखील शिक्षण प्रसाराचे कार्य केले. पैठण, नाशिक,तेर,जुन्नर देवगिरी ही जैन शिक्षणकेंद्रे प्रसिध्द होती.

लोकांना धार्मिक प्रवचने ऐकण्याची सोय व्हावी म्हणून केलिमाने एका ब्रह्मपूरीमध्ये (वाग्देवीचे)एक मंदिर बांधले. पोथी पुराणे हे ही समाज शिक्षणाचे एक अंग होय व त्याचे उल्लेख दोन तीन ठिकाणी आढळतात. ही पुराणे देवळातून चालत.18 तसेच गदोभांडारीसारख्या श्रीमंताच्या वाडयातूनही चालत असत.19 पुराण सांगणारे लक्ष्मीद्रभट, सारंग पंडीत, सारखे चांगले विद्वान असत. या पुराणातून लोकांना ज्ञान मिळे. सोबत वक्तृत्वाला बाहेर येऊन अभिनयासह वेगवेगळया प्रकारचे रस प्रकट होत.[20] ही प्रवचने कशी चालत याची कल्पना गोविंदप्रभूचरित्रातील एका प्रसंगावरून येते. एका प्रसंगी स्वतः म्हाईभटानी पदे करणे अर्थ लावणे, आक्षेप घेणे व  त्याचा परिहार करून हे सर्व आपणच करून गीता वाखाणिली म्हणजे गीतेवर व्याख्यान केले. या उल्लेखावरून येते.[21]

शिक्षणपध्दतीबद्दल लीळाचरित्रात आणखी काही महत्वाचे उल्लेख सापडतात. त्यामध्ये अध्ययनाच्या म्हणजे सुटीच्या दिवसाचा उल्लेख महत्वाचा आहे. पण त्याहीपेक्षा मामाठाणी राहून वाराने जेऊन शिकणाऱ्या चंद्रदेवाचा उल्लेख अधिक महत्वाचा आहे. तसेच शिक्षणव्यवस्थेबाबत आणखी एक महत्वाचा उल्लेख म्हणजे 'प्रभाकर' नावाच्या दर्शनाच्या (मीमांसा दर्शनाची एक टीका) अध्ययनाची महाराष्ट्रात सोय नसणे ही होय. म्हाईभटानी पाच दर्शने येथे वाचली पण सहाव्या 'प्रभाकर' दर्शनाच्या अध्ययनासाठी त्यांना तेलंगणात जावे लागले असे नमूद केले आहे.[22]

उच्च शिक्षण देणाऱ्या आचार्यांच्या मठांना देवालयांना असलेल्या उत्पन्नाशिवाय स्वतंत्र जमिनी दिल्या जात. खानदेशातील वाघळी विद्यापीठात अध्यापन करणाऱ्या शिक्षकाचे ऐहिक विद्या शिकवणारे व परमार्थिक हिताचे विद्यादान करणारे असे दोन वर्ग मानले जात. परंतु दोन्ही वर्गातील शिक्षकांना प्रत्येक सोळा निवर्तने जमीन नावे करून दिलेली होती.

सातवाहनकाळापासून महाराष्ट्रात शिक्षणाचे नूतन पर्व सुरू झाले. सातवाहन राज्यकर्त्यांनी शैक्षणिक चळवळीला गती दिली. ते स्वतः विद्वान होते. हेच धोरण वाकाटक राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार व यादव या राज्यकर्त्यांनी राबविले . त्यामुळे महाराष्ट्रात प्राचीन काळी शिक्षणाचा प्रसार होऊ शकला. तेव्हा धर्माचा प्रभाव शिक्षण क्षेत्रावर असलेला दिसून येतो. शिक्षणव्यवस्थेत संस्कारांना अतिशय महत्व होते. गुरूजनांना समाजात मानसन्मान होता. शुद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. लोककला या पाहून पाहून शिकल्या गेल्या. व्यावसायिक शिक्षण त्या त्या जातीतील वडीलधाऱ्या लोकाकडून घरच्याघरी बालपणापासून दिले जात असे. डोंगरातील अखंड पाषाणात कोरलेली लेणी, शिल्प पाहिल्यांनतर हे मान्य करावे लागते की, प्राचीन महाराष्ट्रीयन लोकांना लेणी कोरण्यासाठी कोणत्या जातीचा पाषाण निवडावा , लेणी शिल्प कोरण्यासाठी कार्यक्षम धातूची अवजारे बनविण्याचे

ज्ञान होते.अजिंठयाची चित्रकला पाहिल्यानंतर चित्र चितारण्यासाठी प्लास्टर कसे करावे, वेगवेगळे रंग कसे बनवावेत, चित्र शिल्पात जिवंतपणाचा कसा आणावा हे त्यांना माहित होते. प्राचीन मंदिरे चैत्य, विहार, स्तूप शिल्प, पाहिल्यानंतर लक्षात येते की, तेव्हा पाषाणशास्त्र , गणित रसायनशास्त्र, धातूशास्त्र, मूर्तिशास्त्र स्थापत्यशास्त्र, संगीत यांचे उत्तम ज्ञान व शिक्षण लोकांना होते हे समजते. प्राचीन लेणी , मंदिरे तसेच तत्कालीन ग्रंथ म्हणजे कलात्मक कौशल्याबरोबर अत्यंत विकसित अशी शिक्षण ज्ञानाचे व प्रगल्भ बुध्दिमत्तेचे तत्कालीन साक्षीदार आहेत. ब्राह्मण वर्णातील व राजकुटूंबातील स्त्रियांना फक्त स्वगृही शिक्षण घेण्याचा अधिकार होता. दहाव्या शतकानंतर ब्राह्मणेत्तर वर्णातील लोकांना तसेच सर्वच वर्णातील स्त्रियांना वेद, संस्कृत वगैरे शिक्षण नाकारले गेल्यामुळे लोकांत अंधश्रध्दा निरक्षरता वाढली. जातीभेद विषमता वाढली. वैज्ञानिकदृष्टया महाराष्ट्र मागे पडला. यातून समाजाला बाहेर काढण्यासाठी नाथ, महानुभाव, वारकरी वगैरे भक्तीसंप्रदायाने पुढील काळात समाजजागृती व लोकशिक्षणाचे कार्य केले.

**संदर्भः**


1) देशपांडे, ब्रम्हांनद , शोधमुद्रा खंड–2, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, 1998,पृ.84–85.

2) वर्मा ओ.पी.यादवाज ॲण्ड देअर टाईम्स,विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर 1970,पृ.257.

3) काणे, पी.व्ही, हिस्टरी ऑफ धर्मशाास्त्राज , मंडळ नागपूर, धर्मशास्त्राज , खंड 3 भाग 1, भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टीटयूट , पुणे, 1974, पृ.68.

4) देशपांडे, ब्रह्मानंद, पूर्वोक्त, पृ.88

5) तुळपुळे, शं.गो. (संपा) ,लीळाचरित्र उत्तरार्ध, भाग–1,सुविचार प्रकाशन, नागपूर, 1967 लीळा,6

6) देव शां.भा.(संपा), महाराष्ट्र गोवा शिलालेख ताम्रपटाची वर्णनात्मक संदर्भ सूची, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 1982 पृ.240

7) मोरवंचीकर रा.श्री, सातवाहनकालीन महाराष्ट्र, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 2009, पृ.165

8) भिंडे , बा.अ. (संपा) , सार्थ श्री ज्ञानेश्वरी , कर्नाटक हाऊस चिरा बाजार, मुंबई,1953 अध्याय पहिला, ओवी 9–14,अध्याय 13 ओवी 826–840

5) तुळपुळे, शं.गो. (संपा) ,लीळाचरित्र पूर्वार्ध भाग–1,सुविचार प्रकाशन, नागपूर, 1966 लीळा,12,26,49,53,56,58,73,109,222

10) पंडित बाबाजी महाराज (संपा.) , श्री ज्ञानेश्वरी गुढार्थ दिपीका, विदर्भ प्रभा प्रकाशन, खामला रोड, नागपूर, 1985, अध्याय 17 ओवी 222.

11) कोलते वि.भि.(संपा.) उध्दवगीता, मुधोळकर बंगला, अमरावती 1935, ओवी 22

12) कोलते वि.भि.(संपा.) शिशुपालवध, अरूण प्रकाशन मलकापूर, 1960, ओवी 227

13) तुळपुळे, शं.गो. (संपा) ,लीळाचरित्र पूर्वार्ध भाग–1,सुविचार प्रकाशन, नागपूर, 1966 लीळा,56

14)कुलकर्णी व.दि.. (संपा) ,श्रीगोविंदप्रभू चरित्र ,व्हीनस प्रकाशन, पुणे, 1980 लीळा,2,3

15) रोडे सोमनाथ (संपा) ,मराठवाडा इतिहास परिषद इतिहा संशोधन पत्रिका, खंड सहावा, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद,2001,पृ.68

16)नेने ह.ना. (संपा) ,लीळाचरित्र एकांक भाग–1, महानुभव समाज,नागपूर,1954 लीळा,–31

17) पाध्ये के.आ.,हेमांद्री ऊर्फ हेमाडपंत यांचे चरित्र, ॲडव्होकेट,मुंबई हायकोर्ट, मुंबई,1931, पृ.358

18)कुलकर्णी व.दि.. (संपा) ,पूर्वोक्त, लीळा,213

19) तुळपुळे, शं.गो. (संपा) ,लीळाचरित्र पूर्वार्ध भाग–1, 1966 लीळा,8

20)कुलकर्णी व.दि.. (संपा) ,पूर्वोक्त, लीळा,213

21) कित्ता – लीळा 135

22) तुळपुळे, शं.गो. (संपा) ,लीळाचरित्र उत्तरार्ध भाग–1, 1967 लीळा,83,108,113